विदर्भ, नागपूर, मराठवाडा, मुंबई, ठाणे, नाशिक, कोकण, गोवा, नांदेड, लातूर, अहिल्यानगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, रायगड उर्वरित संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यातून वितरीत होणारे एकमेव दैनिक

# लोकमान्य सांजवार्ता

आर.एन.आय. नं. ७०१११/१९९९ रजि. नं. पी.सी.डब्ल्यू/००९/२०२४-२०२६

ered ◆ शहर आवृत्ती/पुणे, गुरुवार दि. २ ऑक्टोबर २०२५ (दैनिक) Posted at S.P. College Post Pune-30 / October 2025

## 'मानवी हक्कांची संस्कृती रुजवावी' : न्यायमूर्ती ए. एम. बदर

# तरुणांनी पथनाट्याच्या माध्यमातून दिला मानवाधिकार जनजागृतीचा संदेश

**पुणे :** डॉ. डी. वाय. पाटील लॉ कॉलेज, पिंपरी मध्ये दोन दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील पथनाट्य स्पर्धा आणि कार्यशाळा उत्साहात पार पडली. महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग,मुंबई व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सहकार्याने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. मानवाधिकारांविषयी जागरूकता निर्माण करण्याचा उद्देश असलेल्या या उपक्रमाला विविध महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.




या दोन दिवसीय कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्राला महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाचे सदस्य (सेवानिवृत्त आयपीएस) श्री. संजय कुमार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यकारी निबंधक प्रा.(डॉ.) ज्योती भाकरे व डी वाय पाटील कला वाणिज्य विज्ञान, पिंपरी चे प्राचार्य उपस्थित होते. समारोप सत्राला राज्य मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती ए. एम. बदर यांच्यासह प्र. कुलगुरू सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ डॉ. पराग काळकर आणि राज्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अतिरिक्त आयुक्त संदीप दिवाण आदी मान्यवर उपस्थित होते.